**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ११/२०२०** **दिनांक ०७/०२/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०१/०२/२०२० ते ०७/०२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०८/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून १२/०२/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/०२ | ०२/०२ | ०३/०२ | ०४/०२ | ०५/०२ | ०६/०२ | ०७/०२ | | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ | ११/०२ | १२/०२ |
| - | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | ३१.२ | ३२.४ | ३३.५ | ३२.६ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३३ | ३४ | ३४ |
| - | १९.१ | - | १८.८ | १८.६ | १७.४ | - | **किमान तापमान (अं.से)** | १७ | १९ | २० | २१ | २१ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ३ | ० | २ | ४ | ३ |
| - | ८६ | १०० | १०० | ७१ | ८६ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५४ | ४८ | ५९ | ७० | ६३ |
| - | - | ७९ | ५२ | ५१ | ४० | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २२ | २८ | ३३ | ४१ | ४१ |
| - | ४ | २ | २ | ४ | २ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | १५ | १० | ४ | ७ |
| - | इ.उ. | इ.उ. | इ.उ. | इ.उ. | इ.उ. | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | ई.पू. | पू. | ई.पू. | ई.पू. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ८ ते १२ फेब्रुवारी २०२० दरम्यान कमाल तापमान ३२ ते ३४ अं.सें. व किमान तापमान १७ ते २१ अं.सें. दरम्यान राहून आकाश अंशत: ढगाळ राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **वाल** | **दाणे अवस्था** | • वाल पिकामध्ये शेंगा पोखरणारी अळी व घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीचा प्रादुर्भाव सुरुवातीला कोवळ्या कळ्यावर दिसून येतो व नंतर शेंगामध्ये शिरून कोवळ्या दाण्यांवर उपजीविका करते. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. तसेच शेतामध्ये पक्षी थांबे उभारावे.<br>• वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति संवेदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था** | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| **नारळ** | - | • नारळावर रुगोज चक्राकार पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून या किडीची पिल्ले आणि प्रौढ पानाच्या खालील बाजूस रस शोषतात. तसेच माशी गोड चिकट स्त्राव सोडत असल्याने पानांवर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. किडीच्या नियंत्रणासाठी ३० मि.ली. कडूलिंब तेल (०.५ टक्के प्रवाही) प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. तसेच पानावरील काळी बुरशीच्या व्यवस्थापनासाठी १ टक्के स्टार्च सोल्युशन फवारावे.<br>• पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा तिसरा हप्ता द्यावा.<br>• नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. या किडीच्या प्रभावी व्यवस्थापनेसाठी नारळ बागेत स्वच्छता ठेवावी नारळाच्या आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे तसेच ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. अधिक ७.५ मि.ली. पाणी मिसळून वर्षातून तीन वेळा (ऑक्टोबर ते नोव्हेंबर, जानेवारी तो फेब्रुवारी आणि एप्रिल ते मे ) मुळाद्वारे द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि.ली. प्रती लिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **दुभती जनावरे** | - | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे व दिवसा गोठयाची दारे व खिडक्या खुली ठेवावीत जेणे करून हवा खेळती राहील. |
| **कुकुटपालन** | - | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**